महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा MHADA

==========================================================================

जावक क्रमांक – ७५२/५१ दिनांक :- २२ एप्रिल, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे जनता दरबार दिन

* पहिल्याच जनता दरबार दिनात ५४ तक्रारींचे तात्काळ निवारण
* म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांच्या निर्देशानुसार १०० दिवसांच्या कृती आराखड्याची तात्काळ अंमलबजावणी

मुंबई, दि. २२ एप्रिल, २०२५ :- जनसामान्यांच्या समस्यांकडे तात्काळ लक्ष देत त्यांचे निवारण करण्याच्या उद्देशाने 'म्हाडा'च्या मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे आज जनता दरबार दिनाचे आयोजन करण्यात आले.

वांद्रे (पूर्व) येथील म्हाडा मुख्यालयातील भारतरत्न गुलजारीलाल नंदा सभागृहात झालेल्या या विशेष उपक्रमात, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद शंभरकर यांच्या अध्यक्षतेखाली एकूण ५४ तक्रार अर्जांवर सुनावणी करण्यात आली. श्री. शंभरकर यांनी सर्व अर्जदारांच्या समस्यांचे त्वरित निराकरण करत अर्जदारांच्या मागण्या व प्रलंबित कामे तत्परतेने सोडविण्याचे निर्देश संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रशासनिक विभागांकरिता मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार व राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी केलेल्या सूचनेनुसार १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. म्हाडाच्या सर्व विभागीय मंडळांनी १०० दिवसांच्या सात कलमी कृती आराखड्यातील "नागरिकांच्या तक्रारींचे निवारण" या महत्त्वपूर्ण घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जनता दिन आयोजित करावा, असे निर्देश 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी दिले आहेत. या निर्देशांची तात्काळ अंमलबजावणी करत कोकण मंडळाने आजचा जनता दरबार यशस्वीपणे पार पाडला आणि शासनाच्या जनकल्याणकारी धोरणांची प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचा प्रत्यय दिला.

लोकशाही व्यवस्थेतील पारदर्शकता आणि जनतेशी थेट संवाद यांना अधोरेखित करणारी ही अभिनव संकल्पना पुढे नेण्याचा निर्धार मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाने केला आहे.

आजच्या जनता दरबार दिनात, वर्षानुवर्षे संक्रमण शिबिरात राहून पुनर्वसन सदनिका न मिळणे, उपकरप्राप्त इमारतीचा पुनर्विकास होऊन देखील पुनर्वसन सदनिका न मिळणे, पुनर्विकसित इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र न मिळाल्याने पुनर्वसन सदनिकांचा ताबा न मिळणे, उपकरप्राप्त इमारतींमधील पुनर्विकासासाठी भाडेकरू/रहिवासी यांची तपासणी करणे आदी मुद्यांवरील तक्रारी उपस्थित करण्यात आल्या. श्री. शंभरकर यांनी सर्व अर्जदारांचे म्हणणे सहानुभूतीपूर्वक ऐकून घेऊन, संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ व योग्य कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

--------------------------------------------------------------------------

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

X @mhadaofficial  @mhadaofficial  @mhadaofficial  @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**

Public Relations Department

Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

===========================================================================

Outward No. : 752/51 Dt. April 22, 2025

**Press Release**

# 54 Complaints addressed during first Janata Darbar Din organised by MHADA's Mumbai Building Repairs and Reconstruction Board

100-Day Action Plan implemented under the guidance of Mr. Sanjeev Jaiswal, IAS, Vice President and CEO, MHADA

Mumbai, April 22, 2025: The Mumbai Building Repairs and Reconstruction Board of the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) today conducted its first Janata Darbar Din as part of the 100-Day Action Plan, during which 54 public grievances were addressed. The initiative, aimed at ensuring timely redressal of citizens' complaints, reflects MHADA's commitment to enhancing public service delivery.

The Janata Darbar was held at the Bharatratna Gulzarilal Nanda Hall, MHADA Headquarters, Bandra (East), under the leadership of Mr. Milind Shambharkar, Chief Officer, Mumbai Building Repairs and Reconstruction Board. Mr. Shambharkar directed the concerned officers to resolve the issues raised promptly and to ensure that any pending matters are settled at the earliest.

A 100-Day Action Plan has been implemented across all government departments as per the directives of the Hon'ble Chief Minister Mr. Devendra Fadnavis and the Hon'ble Deputy Chief Minister and Housing Minister Mr. Eknath Shinde, aimed at strengthening citizen-centric governance. In line with these directives, Mr. Sanjeev Jaiswal, IAS, Vice President and Chief Executive Officer, MHADA, has instructed all regional boards to hold Janata Darbar Dins to address public grievances effectively. Acting on these instructions, the Mumbai Building Repairs and Reconstruction Board successfully conducted today's Janata Darbar, demonstrating MHADA's commitment to the timely implementation of public welfare initiatives.

Citizens raised concerns including the non-allotment of rehabilitation units to families living in transit camps for many years, non-receipt of rehabilitation units after redevelopment of cess properties, delays in obtaining occupancy certificates for redeveloped buildings affecting possession of units, and the urgent need for verification of documents for tenants and residents in cess properties undergoing redevelopment.

Mr. Shambharkar heard all the applications and instructed the concerned officers to take immediate and appropriate action to ensure that all complaints are resolved fairly and within the stipulated time.

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA

---

**Follow us on :**

X @mhadaofficial Facebook @mhadaofficial Instagram @mhadaofficial YouTube @mhadaofficial


मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
जनता
दरबार


जनता
दरबार




मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
जनता
दरबार


मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
जनता
दरबार


मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
जनता
दरबार